(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)
NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# ऑनलाईन शिक्षणातील फायदे, तोटे व उपायांचे अध्ययन

**प्रा.डॉ.लिना शरदराव गावंडे** सहयोगी प्राध्यापक गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख स्व.पंचफुलाबाई पावडे कला,वाणिज्य महिला महाविद्यालय वरुड जि. अमरावती

---

**प्रस्तावना**

जगाच्या इतिहासातील २०२० हे वर्ष जग ठप्प करणारे वर्ष म्हणून इतिहासात ओळखले जाईल. कोरोना महामारीच्या काळात केवळ भारतच नव्हे,तर संपूर्ण जगात शिकण्याच्या नविन पद्धती स्वीकारण्यात आल्या. खूप पूर्वीपासून प्रगत राष्ट्रामध्ये ऑनलाईन शिक्षणावर भर देण्यात येत आहे.आणि त्याठिकाणी ऑनलाईन शिक्षणाच्या सोई सुविधा देखील तेवढ्या प्रमाणामध्ये विकसित झालेल्या आहेत. आपल्या विद्यापीठात काही कोर्सेस ऑनलाईन पद्धतीने शिकविले जात,शासकीय पातळीवर मिटिंग घेण्यात येत,प्रशिक्षण आयोजित केली जात,परंतु आपल्या देशाचा विचार करता अजूनही ग्रामीण भागामध्ये इंटरनेट सुविधा पोहचू शकलेल्या नाही.

२०२० हे वर्ष जग ठप्प करणारे वर्ष होते तेव्हा शिक्षण क्षेत्रही ठप्प होते की काय अशी शंका वाटू लागली परंतु सर्वप्रथम शिक्षण विभागाने पुढाकार घेऊन ऑनलाईन अध्यापनाला सुरवात केली.त्यामुळेच त्याचे व्यापक स्वरूप समाजापुढे आले.समाजाचा असा एक घटक आजही आहे, ज्याच्याकडे स्मार्टफोन, laptop, tab इ.उपलब्ध नाहीत.विशेषतः ग्रामीण भागामध्ये या समस्या दिसून येतात.मात्र प्रगतीकडे वाटचाल करीत असताना हे चित्र हळूहळू बदलत आहे.कोरोना काळात शाळा,कॉलेज बंद ठेवण्यात आले होते.मात्र शिक्षण थांबून चालणार नव्हते म्हणूनच या महामारीच्या काळात पहिल्यांदा शिक्षणाच्या पद्धतीत बऱ्याच अंशी बदल झाले यातील सकारात्मक गोष्ट म्हणजे आई-वडील, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षणव्यवस्था यांना ऑनलाईन शिक्षणाचे महत्व समजू लागले. ज्या मोबाइलच्या वापराला एकेकाळी शालेय परिसरात बंदी होती त्याचाच वापर करून आज नविन शिक्षण पद्धत घराघरात सुरु झाली.आता पुढील शिक्षणाची वाटचाल कशी असेल याबद्दल समाजातील लहान,थोर, विद्यार्थी, शिक्षक, पालक,अधिकारी,शिक्षण, पालक, अधिकारी, शिक्षकत ,विचारवंत विचार करू लागले. सद्यस्थिती पाहता आजचे २१ वे शतक "संगणकयुग'म्हणून ओळखले जाते.इंटरनेट च्या वापरामुळे माहितीच्या महाजालाने जग खूप जवळ आले आहे. यामुळे आजच्या शिक्षणात माहिती तंत्रज्ञानाचा (information technology )सहभाग आवशक मानला जातो.

ऑनलाईन शिक्षण प्रवाहातील समाज हा 'सहकारी गृहनिर्माण संस्था '(triple a society) म्हणून ओळखल्या जात आहे."you can connect anyone, at anywhere in the world, at anytime आपण जगाच्या कोणत्याही ठिकाणी कोणत्याही व्यक्तीबरोबर, कोणत्याही क्षणी संपर्क साधू शकतो. माहितीच्या अफाट विश्वात जर आज ऑनलाईन शिक्षण हा एक अपरिहार्य विकल्प आपल्यासमोर असेल तर त्याचे यशपयश आणि बऱ्या वाईट परिणामाची चर्चा होणे अपेक्षित आहे.किंबहुना अशी तुलनात्मक चर्चा आवशकच आहे.

ब्रिजसञ्ज्ञा – ऑनलाईन, तंत्रज्ञान, माहिती, संवाद.

**ऑनलाईन म्हणजे काय ?**

ऑनलाईन या शब्दाचा वापर सर्वप्रथम१९५० साली झाला.

१)"ऑनलाईन अध्यापन म्हणजे एकमेकापासून दूरवर असलेल्या दोन माणसात परस्पर संवादघडून आणणे होय."

२)"जगभरातील कानाकोपऱ्यातील विद्यार्थ्याला एकमेकाशी संवाद घडवून आणणारी यत्रना म्हणजे ऑनलाईन अध्यापन होय.

**ऑनलाईन अध्यापनाचे फायदे** –

1. वयस्क व दूर राहणाऱ्या अभ्यासकासाठी ही पद्धत योग्य आहे.
2. ऑनलाईन शिक्षणामुळे खर्चाची बरीच बचत होते.
3. ऑनलाईन शिक्षणामुळे ट्राफिक कमी,इंधन बचत व अपघात कमी होतील.
4. शहरातील दर्जेदार शिक्षण ग्रामीण भागातील मुलानाही मिळू शकते.
5. संसर्ग टाळता येतो व वेळेची बचत होते.
6. विद्यार्थी तात्रिक कौशल्य प्राप्त करतात सोबतच त्यांना तंत्रद्यानाचा परिचय होतो.
7. विषयाशी निगडीत संदर्भ साहित्य विद्यार्थी स्वतः शोधू शकतात.
8. ऑनलाईन पद्धतीने पालक सभा घेणे सोयीचे होते.
9. ऑनलाईन शिक्षण पद्धतीमध्ये प्रत्येक विद्यार्थीसोबत व्यक्तिगत संवाद होतो.
10. ऑनलाईन पद्धतीमध्ये मुले आपल्या शंका निसंकोचपणे विचारू शकतात.

**ऑनलाईन अध्यापनाचे तोटे** –

1. ऑनलाईन शिक्षणात मुलांचा सामाजिक विकास होत नाही.
2. इंटरनेट व्यवस्थित नसेल तर शिक्षकांचा आवाज येत नाही त्यामुळे तासिका पूर्ण होऊ शकत नाही.
3. तांत्रिक अडचणी वारंवार आल्यास मुलांची अध्यापनात रुची राहत नाही.
4. मुलांना डोळ्याचे आजार होऊन शारीरिक विकासही योग्य होत नाही.
5. सतत बैठक होत असल्यामुळे लठ्ठपणा वाढतो.
6. वीजपुरवठा जिथे वारंवार खंडीत होतो तेथे ऑनलाईन शिक्षण पद्धती फेल आहे.
7. ऑनलाईन पद्धतीत मोबाइलच्या अतिवारामुळे मुलांच्या मानसिक आरोग्याचा प्रश्न आज पालकासमोर आहे.
8. प्रयोगशाळेतील प्रयोग ऑनलाईन शिकविणे कठीण जात आहे.
9. ऑनलाईन शिक्षणात मुले बेशिस्त होतांना दिसत आहे.
10. मुलामधील उत्साह कमी होऊन त्याच्यात मानसिक समस्या उद्भवत आहे.

**ऑनलाईन अध्यापनासाठी उपाय** –

* ग्रामीण भागात वीजपुरवठा सुरळीत करावा नेटवर्क व इंटरनेट सुविधा उपलब्ध करण्यात यावी.
* गरीब विद्यार्थ्यांना स्मार्टफोन दयावेत त्यासाठी लागणारे इंटरनेट व पुरेसा डेटा मोफत उपलब्ध करून द्यावा.
* ऑनलाईन वर्ग सुरु असतांना व्हिडीओ सुरु ठेवण्याची सक्ती करावी.
* दर अर्ध्या तासांनी मुलांना डोळ्याचे व्यायाम करायला सांगायला हवे,त्यामुळे डोळ्यांना त्रास होणार नाही.
* ठळक मुद्दे शक्यतोवर हाताने लिहायला प्रोत्साहन द्यावे.
* फोनवरून मैत्रीपूर्ण संवाद साधून विद्यार्थ्याच्या समस्या जाणून घेऊन त्यांना आम्ही तुमच्या सोबत आहोत हा दिलासा द्यावा.

विद्यार्थी हा ऑनलाईन शिक्षणाचा केंद्रबिंदू आहे.थोडक्यात विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिक्षणही तितक्याच गोडीने आत्मसात करायला हवे.ऑनलाईन शिक्षणाबरोबरच पाठ्यपुस्तकाचे वाचन करावे.ऑनलाईन वर्गाबरोबरच इतर कलात्मक, प्रयोगशील शिक्षण देखील द्यावे,स्क्रीनटाइम दोन तासापेक्षा

जास्त होणार नाही, याची दक्षता घ्यावी.ज्याप्रमाणे सगळे शिक्षण पुस्तकातून / शाळेतून मिळत नाही, त्याप्रमाणे ऑनलाईन शिक्षनातुनही त्याला सगळ्याच प्रकारचे ज्ञान मिळेल असेही नाही.

**निष्कर्ष** –

ऑनलाईन शिक्षण पद्धतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलताना आपल्याला दिसत आहे.ऑनलाईन शिक्षण का गरजेचे आहे? हे आपल्याला समजण्यास मदत झाली आहे. योग्य व्यवस्थापन केले तर ऑनलाईन शिक्षण हे नव्या युगासाठी एक नवे वरदान ठरेल यात शंका नाही प्रत्येक मुलाची गरज ओळखून त्यानुसार ऑनलाईन शिक्षणाची व्यवस्था करणे गरजेचे आहे. काही मुलांना ऐकून चागले समजते, तर काहीना पाहून,तर काही मुलांना प्रत्येक्ष कृती करून, मुलांच्या या अध्ययन शैलीचा विचार करून ऑनलाईन शिक्षण पद्धतीमध्ये इ. सर्व गोष्टीचा समग्र विचार होणे आवशक आहे.

मुलांना व्हिडीओच्या माध्यमातून एखादी गोष्ट चटकन समजते.ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून उपलब्ध असलेले अत्यंत दर्जेदार साहित्य येणाऱ्या काळात वरदान ठरेल, आणि म्हणूनच ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून त्यांना अधिक सक्रीय करता येईल. विशेष म्हणजे नव्या युगाच्या शिक्षणाची हीच खरी मागणी आहे.देशातील प्रत्येक नागरिकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे हा त्याचा मुलभूत अधिकार आहे.त्यातूनच योग्य करियर निवडले जावू शकते. ऑनलाईन शिक्षण एक अशी प्रणाली आहे ज्यात इंटरनेटचा वापर करून देशातील किवा जगभरातील कोणत्याही कोप-यात असलेल्या विध्यार्थ्यांना शिक्षण देऊ शकतात.परंतु बाल व किशोरवयीन मुलांसाठी पारंपारिक पद्धतीने शाळेत जाऊन शिक्षण घेणे जास्त योग्य आहे.शिक्षणाच्या या दोन्ही पद्धती वापरून विद्यार्थी आयुष्यात यशस्वी होऊ शकतो,प्रगती करू शकतो.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. मानकर अनिल, नोव्हेंबर २०२२ 'शिक्षण संक्रमण' ऑनलाईन अध्यापनातील समस्या/उपाय पेज न. ११ ते १७.
2. आमणगी सुधीर ऑक्टो. २०२२ शिक्षण संक्रमण' ऑनलाईन अध्यापनातील समस्या/उपाय पेज न. २५ ते ३३.
3. साठे सुरेखा, ऑक्टो. २०२२ शिक्षण संक्रमण' ऑनलाईन अध्यापनातील समस्या/उपाय पेज न. ३५ ते ३६.
4. रघुनाथन व्ही. १ जुलै २०१२, 'शर्यत शिक्षणाची' रोहन प्रकाशन पुणे पहिली आवृत्ती २०१२.